# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


झोपुप्रा/ तह-ताबा/६५२/२०२५
दिनांक:- ०७/०७/२०२५

परिपत्रक क्र. १३ / २०२५

विषय:- झोपडीधारकांना सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र करतेवेळी झोपुप्राकडे विहित शुल्काचा भरणा करणे, अशा प्रकरणी संक्रमण व्यवस्था आणि पुनर्वसन प्रक्रिया पार पाडणे.

संदर्भ:-
१. शासन निर्णय क्रमांक - झोपुधो-१००१/प्र.क्र. १२५/१४/झोपसु-१, दि. १६ मे २०१५
२. शासन निर्णय क्रमांक - झोपुधो-०८१०/प्र.क्र. ९६/२०१८/झोपसु-१, दि. १६ मे २०१८
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२२/प्र.क्र. ५४ (भाग-१)/झोपसु-१, दि. २५ मे २०२३
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२२/प्र.क्र. ५४ (भाग-१)/झोपसु-१, दि. १४ ऑगस्ट २०२३

उपरोक्त संदर्भान्वये दि. १ जाने. २००१ ते दि. ३१ डिसें. २०१० या कालावधीतील वास्तव्यामुळे सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र ठरलेल्या झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत संदर्भीय शासन निर्णय पारित झाले आहेत. सशुल्क पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांसाठी पुनर्वसन सदनिकेचे शुल्क रुपये २.५० लक्ष या रक्कमेचा भरणा करणे तसेच सशुल्क पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना विकसकामार्फत संक्रमण व्यवस्थेपोटी भाडे रक्कम अदा करणे/ तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिराची व्यवस्था करणे याबाबत या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी सशुल्क पुनर्वसनासाठी प्रचलित शासन निर्देशानुसार पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांच्या नावाची नोंद पात्रता यादीमध्ये सशर्त करावी. अशा प्रकरणी शेरा रकान्यामध्ये शासन निर्धारित रु. २.५० लक्ष रक्कमेचा भरणा केल्यानंतर पुनर्वसनासाठी पात्र अशी नोंद ठेवावी. अशा झोपडीधारकास पात्रता यादी तयार करतेवेळी किंवा पुनर्वसन सदनिका वाटप करेपर्यंत अशी रक्कम झोपुप्राकडे जमा करता येईल. त्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी चलन तयार करणे व लेखा विभागाने अशी रक्कम झो.पु. प्राधिकरणाकडे जमा करुन घेणे आवश्यक असेल.

२. सदर रक्कमेचा भरणा झाल्याशिवाय सशुल्क पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांचा सदर योजनेसाठी तयार केलेल्या पात्रता यादीत पात्र झोपडीधारक म्हणून अंतिमत: समावेश होणार नाही व त्यांना तेथील अन्य पात्र झोपडधारकांसाठी उपलब्ध केलेल्या संक्रमण व्यवस्थेचे लाभ देय होणार नाहीत. शासन निर्धारित रक्कमेचा भरणा झाल्यानंतर अशा झोपडीधारकांचा पात्रता यादीतील शेरा सदरी केलेल्या नोंदीचा तपशील अद्यावत करण्यात यावा.

३. झो.पु.प्रा.च्या ताबा विभागामार्फत सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र ठरलेल्या झोपडीधारकांसंदर्भात योजनानिहाय व मनपा स्तरीय प्रतिक्षा यादी स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रतिक्षा याद्या झोपुप्राच्या संकेतस्थळावर आणि नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात याव्यात.

४. झोपडीधारकांनी सशुल्क पुनर्वसनाकरीता शासन निर्धारित शुल्क जमा केल्यानंतर त्यांना पुनर्वसन सदनिका वाटप करेपर्यंतच्या कालावधीसाठी तेथील योजना राबवित असलेल्या विकसकाने अन्य झोपडीधारकांना अशा कालावधीसाठी अनुज्ञेय केलेल्या रक्कमेइतकी झो.पु. प्राधिकरण निर्धारित किमान भाडेरक्कमेपेक्षा जास्त भाडे रक्कम अदा करणे किंवा विकसकाने अशा झोपडीधारकांचे संदर्भात संक्रमण व्यवस्था करणे बंधनकारक असेल.

५. झोपडीधारकांचे वास्तव्य असलेल्या मूळ योजना क्षेत्रामध्ये पुनर्वसनाकरीता सदनिका शिल्लक नसल्यास अशा पात्र ठरलेल्या सशुल्क पात्र झोपडीधारकांना झोपुप्राच्या ताब्यातील अन्य योजनांमधील अतिरिक्त सदनिकांचे वाटप ताबा विभागामार्फत करणेत यावे. जर अन्यत्र उपलब्ध केलेली पुनर्वसन सदनिका अशा झोपडीधारकाने स्वीकारली नाही तर असा झोपडीधारक झोपुप्रा मार्फत होणाऱ्या कार्यवाहीस जबाबदार असेल.

६. सशुल्क पुनर्वसन हे फक्त निवासी प्रयोजनाकरिता अनुज्ञेय आहे हे विचारात घेण्यात यावे. यासंदर्भात सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांचे कायक्षेत्रातील अशा प्रकरणांचा तपशील झो.पु. प्राधिकरणाच्या ताबा विभागाकडे वेळोवेळी पाठवावा आणि त्याबाबतचे संकलन करून शासन / झो.पु.प्रा.च्या निर्देशांनुसार कार्यवाही करावी.

7.7.2025

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.